दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. ०३ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### 'लंच ब्रेक'मध्ये झालेला अपघातही कामाचाच भाग, कर्मचारी भरपाईस पात्र

**नवी दिल्ली :** कर्मचारी भरपाई कायद्याची व्याख्या करताना उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, जर एखादा कर्मचारी कार्यस्थळावर 'लंच ब्रेक' (जेवणाच्या सुट्टी) दरम्यान अपघाताचा बळी ठरला, तर तो अपघातही 'कामावर असतानाच झालेला अपघात' मानला जाईल आणि तो कर्मचारी भरपाई मिळण्यास पात्र असेल. जेवणासाठी घेतलेली तात्पुरती विश्रांती ही कर्मचारी आणि त्याचे काम यामधील संबंध संपुष्टात आणत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### ट्रम्प प्रशासनाचा निर्णय! US Visa साठी भरावा लागू शकतो 17 लाखांचा बॉण्ड

**नवी दिल्ली :** अमेरिकेत प्रवासाचे नियोजन करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने 'US Visa Bond Rule' या योजनेला पायलट प्रकल्पातून कायमस्वरूपी धोरणाचा दर्जा दिला आहे. नव्या नियमानुसार, निवडक देशांतील नागरिकांना Business (B-1) किंवा Tourist (B-2) व्हिसासाठी अर्ज करताना २० हजार डॉलर (सुमारे १७ लाख रुपये) पर्यंतचा सिक्युरिटी बॉण्ड भरावा लागू शकतो.

# नाथसागराचे सायरन वाजणार, कोणत्याही क्षणी होणार गोदावरी पात्रात विसर्ग

## सध्याच्या परिस्थितीत 32 हजार 881 क्युसेक पाण्याची आवक सुरु

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**पैठण प्रतिनिधी :-** मराठवाड्याची जलसंपदा असलेले नाथसागर जलाशय तुडुंब भरले असून धरणाचा पाणीसाठा ८५ टक्के झाला आहे.पाणलोट क्षेत्रातील धरणातून जायकवाडीत येणाऱ्या पाण्याची आवक पाहता धरण प्रशासनाकडून कोणत्याही क्षणी गोदावरी पात्रात नाथसागरातून विसर्ग करण्यात येणार असल्याचा ईशारा नागरिकांना देण्यात आला आहे.



अगदी २७% पर्यंत पाणी साठ्याची पातळी खालावलेल्या नाथसागर जलाशयाचा पाणीसाठा नाशिक आणि अहिल्यानगर भागात सुरू असलेल्या चांगल्या पावसामुळे ८५ टक्के पर्यंत गेला असून आता धरण प्रशासनाकडून गोदावरी पात्रात पाण्याचा विसर्ग करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे.

वरील धरणातून नाथसागरात येणाऱ्या पाण्याची आवक वाढल्यास जायकवाडीच्या २७ पैकी ५ वक्र द्वारातून गोदावरी पात्रात विसर्ग करण्यात येणार आहे.तत्पूर्वी नागरिकांनी गोदावरी पात्रात काही तटस्थस्थान वाहने अथवा जनावरे असल्यास तात्काळ तेथून हलवावीत तसेच गोदावरी पात्रात वावर करू नये, पाण्यापासून सतर्क रहावे अशी सूचना जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश हासे तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांच्या वतीने देण्यात आल्या आहे.

रविवारी दिनांक २ ऑगस्ट सायंकाळी ६ वाजता नाथसागर जलाशयाचा पाणी साठा ८४.९० टक्के,पाण्याची आवक ३२ हजार ९३१ क्यूसेक तसेच धरणाच्या उजव्या आणि डाव्या कालव्यातुन १९०० क्यूसेक प्रमाणे पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. नाथसागर जलाशय १००% भरण्यासाठी आणखीन तीन फूट पाण्याची आवश्यकता आहे.मागील वर्षी १ ऑगस्ट रोजी जायकवाडी धरणातून गोदावरी पात्रात विसर्ग करण्यात आला होता.

### नागरिकांना सतर्कतेचे आवाहन, प्रभावित होणारी गावे

**नाथसागरातून विसर्ग होणार असल्याने खबरदारी म्हणून जुने कावसान, चनकवाडी, पाटेगाव, दादेगाव वडवाळी, नायगाव मायगाव आपेगाव नवगाव तुळजापूर टाकळी अंबड, हिरडपुरी आदी गावात दवंडी पीटून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात येत आहे. शहरातील सखल भाग असलेल्या संतनगर,कहारवाडा तसेच गागाभट्ट चौक, नागघाट परिसर आदी ठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने सुचना देण्यात येत आहे.**

## थोडक्यात वार्ता

### हृदयविकाराचा झटका आलेल्या महिलेचा वाहकाने वाचवला जीव

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकात एका महिला प्रवाशाला अचानक हृदयविकाराचा झटका येऊन ती बेशुद्ध पडली. यावेळी वाहक संगीता पालवे यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ सीपीआर देण्यास सुरुवात केली. सुरक्षारक्षक कविता भुतेकर यांनीही मदत केली. वेळेत मिळालेल्या प्राथमिक उपचारांमुळे महिलेची श्वसनक्रिया पूर्ववत होण्यास मदत झाली. त्यानंतर तिला तातडीने शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. या धाडसी आणि तत्पर कृतीबद्दल प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांनी संगीता पालवे यांचे कौतुक केले. छत्रपती संभाजी नगर येथील बस स्थानकात हा प्रकार घडला वेळीच कंडक्टरने मदत केली आणि कारवाई केली याबद्दल कौतुक होत आहे.

### दिल्लीत 2.9 चा सौम्य भूकंप

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्लीमध्ये रविवारी पहाटे सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. पहाटे सुमारे ४ वाजून १४ मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची रिश्टर स्केलवरील तीव्रता २.९ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाची तीव्रता कमी असल्याने आणि तो पहाटेच्या वेळी झाल्यामुळे बहुतांश नागरिकांना त्याची जाणीव झाली नाही. मात्र काही नागरिकांनी हलके कंप जाणवल्याचे सांगितले. सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ४ वाजून १४ मिनिटे १ सेकंदांनी हा भूकंप झाला. त्याचे केंद्र उत्तर दिल्लीमध्ये २८.७२१ अंश उत्तर अक्षांश आणि ७६.९५७ अंश पूर्व रेखांशावर होते. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीपासून सुमारे ८ किलोमीटर खोलीवर असल्याची नोंद करण्यात आली आहे. भूकंपाची खोली कमी असल्यामुळे आसपासच्या भागांमध्येही सौम्य धक्के जाणवण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### पॉक्सो प्रकरणात 20 हजारांची लाच; पो.उपनिरीक्षक जाळ्यात

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा पोलीस ठाण्यातील एका पोलीस उपनिरीक्षकाला पॉक्सो प्रकरणात मदत करण्याच्या मोबदल्यात २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. या कारवाईत एका खासगी व्यक्तीलाही ताब्यात घेण्यात आले असून या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत शिवाजी दवंगे (वय ५७, तारा निवास, साईनगर, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड) आणि खासगी व्यक्ती इब्राहिम करीम वाणी (वय २८, जामुनमाथा, भोरमाळ, ता. सुरगाणा) अशी संशयितांची नावे आहेत.

### मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची छाननी, कामचुकारांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर :** मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची छाननी सुरू करण्यात आली असून, कामचुकारांवर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेतील २,११२ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची लवकरच सखोल छाननी केली जाणार आहे. सहा एजन्सींमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांचा मेळावा घेऊन त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. कामचुकार व गरज नसलेल्या कर्मचाऱ्यांची कपात करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. विभागप्रमुखांकडून प्रत्येक कर्मचाऱ्याचा अहवाल मागविण्यात येणार असून अतिरिक्त कर्मचारी कमी केले जातील. तसेच आर्थिक जबाबदाऱ्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांकडेच असाव्यात, असे निर्देश आयुक्त अमोल येडगे यांनी दिले आहेत.

# पंतप्रधानांच्या हस्ते नशामुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ

**नवी दिल्ली, २ ऑगस्ट :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तरुणांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. अमली पदार्थांमुळे तात्पुरता आनंद मिळतो, पण ते तुमचे करिअर आणि कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त करतात, असे ते म्हणाले. त्यामुळे, आपले तरुण व्यसनाधीनतेचे धोके समजून घेतील आणि सतर्क राहून त्यापासून दूर राहतील, हे सुनिश्चित करण्याचा आपण संकल्प केला पाहिजे.

पंतप्रधान मोदी यांनी नशामुक्त युवा -विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी, देशभरातील २८,००० हून अधिक ठिकाणी एक कोटींहून अधिक तरुण व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले.

पंतप्रधान म्हणाले की, अमली पदार्थांचे व्यसन कुटुंब, समाज आणि राष्ट्राची शक्ती कमकुवत करते. शत्रू देशसुद्धा देशातील तरुणांना अमली पदार्थांच्या व्यसनात ओढण्याचा कट रचतात. परिणामी, अमली पदार्थांच्या पुरवठ्यातून नफा कमावून देशाचा नाश करणे हा देखील एका दहशतवादी कटाचा भाग आहे. त्यामुळे, आपण प्रत्येक तरुणाला अमली पदार्थांच्या व्यसनाच्या विळख्यात सापडण्यापासून वाचवले पाहिजे.



सामूहिक शक्तीवर जोर देत पंतप्रधान म्हणाले की, वैयक्तिक प्रयत्नांमुळे निराशा आणि थकवा येऊ शकतो, पण जेव्हा एखादी मोहीम सामूहिक स्वरूप धारण करते आणि लाखो लोक एकत्र पुढे जातात, तेव्हा सामूहिक शक्ती तिला नवी ऊर्जा देते.

पंतप्रधानांनी माहिती दिली की, देशभरातील लाखो तरुणांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली आहे. त्यांनी सांगितले की, ही शपथ पुढील १०० आठवडे सुरू राहील. या काळात, दर रविवारी कला, संस्कृती, क्रीडा, ध्यान, अध्यात्म आणि सेवा यासंबंधी उपक्रम आयोजित केले जातील. या कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवला जाईल. ते म्हणाले की, येणारे १०० रविवार हे अमली पदार्थमुक्त भारताच्या दिशेने उचललेली १०० भक्कम पावले ठरतील.पंतप्रधानांनी व्यसनमुक्तीसाठी योग, ध्यान आणि पुनर्वसन यांच्या महत्त्वावर भर दिला.

ते म्हणाले की, समाजाच्या पाठिंब्याने या पद्धती व्यक्तीच्या आंतरिक शक्तीला बळकट करतात. त्यांनी नमूद केले की, आज व्यसनमुक्तीसाठी पुनर्वसन केंद्रांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

ते म्हणाले, "जर एखादा तरुण चुकून व्यसनाच्या जाळ्यात अडकला, तर याचा अर्थ असा नाही की त्याच्यासाठी सर्व मार्ग बंद झाले आहेत. योग्य पाठिंबा आणि उपचाराने ते सामान्य जीवनात परत येऊ शकतात."

पंतप्रधानांनी पालकांना आवाहन केले की, सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलांचे व्यसन लपवू नये. मुलांशी संवादाची संस्कृती विकसित करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्यांच्या वर्तनातील बदल लवकर ओळखता येतील.

### 'माझा पुतण्या आज ना उद्या भारताचा पंतप्रधान होईल'





**पुणे :** माझा पुतण्या आज ना उद्या भारताचा पंतप्रधान होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे काका बाळासाहेब फडणवीस म्हणाले. ते पुण्यात देवाभाऊ नावाच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. याप्रसंगी मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

बाळासाहेब फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांच्या कामाचे जाहीर कौतुक केले. तसेच आगामी काळात देवेंद्र फडणवीस हे देशाचे पंतप्रधान होतील, असा विश्वास व्यक्त केला.

देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या राजकारणात सध्याच्या स्थितीत सर्वोच्च नेते म्हणून ओळखले जातात. अनेक राजकीय अभ्यासक त्यांना महाराष्ट्रातले सध्याचे सर्वाधिक ताकदीचे नेते म्हणतात. तब्बल तीन वेळा फडणवीस यांनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. आमदार - विरोधी पक्षनेता - मुख्यमंत्री - विरोधी पक्षनेता - उपमुख्यमंत्री आणि पुन्हा मुख्यमंत्री असा राजकीय प्रवास करणारे आणि आजच्या घडीला राज्याचे राजकारण स्वतःभोवती केंद्रीत करणारे एकमेव नेते असेही राजकीय अभ्यासक देवेंद्र फडणवीस यांचे वर्णन करतात. याच कारणामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पंतप्रधान पदाचा चेहरा म्हणून राजकीय विश्लेषक बघत आहेत.

"लोकसभेच्या २०२९ च्या निवडणुकीसाठी देवेंद्र फडणवीस हे एनडीएचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असू शकतात, असे काही राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

### बीडमध्ये खुनाच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत मागितली वीस लाखांची खंडणी

**बीड :** नैसर्गिक मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या नातेवाईकांनी एका तरुणावर हत्येचा खोटा गुन्हा दाखल करण्याची भीती घालून वीस लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पाच जणांविरोधात अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोखंडी सावरगाव येथील मटण विक्रेते मुख्तार कय्युम कुरेशी (वय ६०) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्यानुसार, इसामिया मोसा कुरेशी या व्यक्तीचा अतिमद्यपानामुळे नैसर्गिक मृत्यू झाला होता. मात्र या घटनेचा गैरफायदा घेत मृत इसामिया याचे नातेवाईक शफी बाबू कुरेशी (वय ६०, रा. गातेगाव, जि. लातूर), अमीन कुरेशी (रा. सोनपेठ, जि. परभणी), जबीन इसामिया कुरेशी (वय ४०), फैजान इसामिया कुरेशी (वय २३) आणि मोहम्मद इसामिया कुरेशी (वय २१, सर्व रा. बाराबाई गल्ली, अंबाजोगाई) यांनी संगनमत केले.

अर्षकॉलनी येथे भरलेल्या न्यायपंचायतीत आरोपींनी तक्रारदाराच्या मुलावर व त्याच्या मित्रावर हत्येचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन २० लाखांची मागणी केली. पैसे देण्यास असमर्थता दर्शवली असता आरोपींनी अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

विशेष म्हणजे आरोपींनी मृतदेह पोलीस ठाण्यासमोर नेऊन धरणे आंदोलन केले. त्यानंतर पोलिसांनी दिलेल्या निर्देशानुसार मृतदेह दफन करण्यात आला असला तरी, आरोपींनी खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन मानसिक त्रास कायम ठेवला व जबरदस्तीने रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी तक्रारदाराच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात शफी कुरेशी, अमीन कुरेशी, जबीन कुरेशी, फैजान कुरेशी आणि मोहम्मद कुरेशी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १९०, ३०८(७), ३५१(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद जोगदंड करत आहेत.

# व्यभिचार सिद्ध झाल्यास पत्नी पोटगीस अपात्र

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली :** पत्नी व्यभिचारात राहत असल्याचे पतीकडून स्पष्टपणे सिद्ध झाल्यास, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत पत्नीला अंतरीम पोटगी नकारली जाऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, व्यभिचाराचा आरोप प्राथमिक दृष्ट्या आणि पुराव्यांच्या आधारे स्पष्टपणे सिद्ध झाला पाहिजे; तरच अंतरीम पोटगीवरील कायदेशीर बंदी लागू होईल.

'बार अँड बेंच'ने दिलेल्यावृत्तानुसार, संबंधित पती-पत्नीचा विवाह जुलै २०१४ मध्ये झाला होता. काही वर्षांनंतर त्यांच्या संबंधांत वाद निर्माण झाल्याने मे २०२० मध्ये पत्नी आपल्या मुलासह वेगळी राहू लागली. नोव्हेंबर २०२० मध्ये तिने उदयपूर न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी आणि अंतरीम पोटगीसाठी अर्ज दाखल केला. या सुनावणीदरम्यान पतीने कलम १२५(४) अंतर्गत अर्ज दाखल करून दावा केला की, पत्नी व्यभिचारात राहत असल्याने ती पोटगीस पात्र नाही. आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ पतीने छायाचित्रे आणि डिजिटल पुरावे सादर केले. कनिष्ठ न्यायालयाने पतीचा कलम १२५(४) अंतर्गतचा अर्ज अंतिम सुनावणीच्या टप्प्यावरच निश्चित केला जाऊ शकतो, असा निर्णय दिला. सादर केलेल्या डिजिटल पुराव्यांची सत्यता मुख्य खटल्याच्या पुराव्यांच्या टप्प्यावरच तपासता येईल, असे नमूद करत कनिष्ठ न्यायालयाने पत्नी आणि मुलासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये अंतरीम पोटगी मंजूर केली. राजस्थान उच्च न्यायालयानेही कनिष्ठ न्यायालयाचा हा निर्णय कायम ठेवला. याविरोधात पतीने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते.

कनिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनाशी सर्वोच्च न्यायालयाने असहमती दर्शवली. खंडपीठाने स्पष्ट केले की, "कलम १२५(४) ची अट अशी आहे की, व्यभिचार सिद्ध झाल्यास पत्नी अंतरीम अथवा अंतिम अशा कोणत्याही पोटगीस पात्र राहत नाही. त्यामुळे पतीने कलम १२५(४) अन्वये अर्ज दाखल करून पहिल्याच टप्प्यात पुराव्यांच्या आधारे आरोप प्राथमिकदृष्ट्या सिद्ध केला, तर अंतरीम पोटगीला कायदेशीर अडसर निर्माण होतो."

# धर्मांतर-विरोधी कायदा राज्यात लागू

## राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर अधिकृत राजपत्र (गॅझेट) प्रकाशित

**मुंबई, २ ऑगस्ट :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर राज्यात धर्मांतर-विरोधी कायदा - 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, 2026' आता राज्यात लागू झाला आहे. या संदर्भातील अधिकृत राजपत्र (गॅझेट) 30 जुलै रोजी प्रकाशित झाले. त्यानुसार राज्यात उपरोक्त कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

सदक्ष विधेयक विधिमंडळाने मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केले होते. पुढे तो मंजुरीसाठी राज्यपाल व नंतर राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. हा कायदा बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करतो. या कायद्याचे उल्लंघन केल्यास सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे, तर पुन्हा गुन्हा करणाऱ्यांसाठी ही शिक्षा 10 वर्षांपर्यंत वाढू शकते. धर्मांतरापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना 60 दिवस आधी सूचना देणे यात अनिवार्य करण्यात आले आहे; तसेच धर्मांतरित व्यक्तीचे पालक, भावंडे आणि इतर नातेवाईक यांना तक्रार करण्याचा अधिकारही यात देण्यात आला आहे. विधानसभेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता, मात्र शिवसेना (यूबीटी) ने त्याला पाठिंबा दिला होता.

काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभेत युक्तिवाद केला होता की, हा कायदा घटनाबाह्य असून तो गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, हा कायदा एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्यासाठी आणला गेला आहे. विरोधकांची अशी मागणी होती की हे विधेयक संयुक्त निवड समितीकडे पाठवले जावे.




### न्यायमूर्ती अनु ग्रोवर बलीगा यांची बदली, नीट पेपरफुटीची आज सुनावणी

**नवी दिल्ली :** देशभरात प्रश्नपत्रिका फुटीच्या वाढत्या प्रकरणांवरून आंदोलने झाल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशा प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्याची घोषणा गेल्या आठवड्यात केली होती. मात्र, या घोषणेनंतर काहीच दिवसांत दिल्ली उच्च न्यायालयाने फास्ट ट्रॅक कोर्टाच्या विशेष न्यायमूर्ती अनु ग्रोवर बलीगा यांची तडकाफडकी बदली केली आहे. आता विशेष न्यायमूर्ती अजय गुप्ता फास्ट ट्रॅक न्यायालयात नीट-यूजी २०२६ पेपर फुटी प्रकरणासह इतर संबंधित खटल्यांची सुनावणी घेतील. दिल्ली उच्च न्यायिक सेवेत केलेल्या मोठ्या प्रशासकीय बदलांचा भाग म्हणून हा फेरबदल केला आहे. न्यायमूर्ती बलीगा यांच्या फास्ट ट्रॅक न्यायालयात २०२६ च्या नीट पेपर फुटी प्रकरणाची पहिली सुनावणी २७ जुलै रोजी होणार होती. मात्र, बचाव पक्षाच्या वकिलांच्या विनंतीवरून ती स्थगित करण्यात आली होती.

# एकाचवेळी 23 नगरसेवक होणार बाद? 'या' मनपात मोठा राजकीय भूकंप; भाजप, MIMला धक्का

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महापालिकेत सर्वात मोठा राजकीय भूकंपा होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे तब्बल २३ नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार लटकली आहे. मनपा प्रशासनाकडून एकूण २३ नगरसेवकांना अपात्रतेच्या नोटीसा पाठवण्यात आल्या असून सत्ताधारी अन् विरोधकांचे दिग्गज नेते अडकल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर महापालिका मनपा प्रशासनाने सत्ताधारी भाजपच्या ७ आणि विरोधी पक्ष असलेल्या एमआयएमच्या तब्बल १६ अशा एकूण २३ नगरसेवकांना अपात्रतेच्या नोटीसा बजावल्या आहेत. यामध्ये विरोधी पक्षनेत्यांसह अनेक मातब्बर नगरसेवकांचा समावेश असल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे.

निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी पुराव्यानिशी केलेल्या तक्रारींनंतर नगर सचिव, जन्म-मृत्यू आणि अतिक्रमण विभागाने प्राथमिक चौकशी केली. तर, प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त होताच प्रशासनाने एकाच दिवशी २३ नगरसेवकांना एकूण ३७ नोटीसा धाडून स्पष्टीकरण मागवले आहे. नोटीस मिळाल्यानंतर भाजप आणि एमआयएम या दोन्ही प्रमुख पक्षांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे.

विशेष म्हणजे प्रशासनाने सर्व २३ नगरसेवकांना आपले म्हणणे आणि पुरावे सादर करण्यासाठी अंतिम संधी दिली आहे. ऑगस्ट महिन्यात १७ आणि २४ तारखेला, तर सप्टेंबरमध्ये ७ आणि १५ तारखेला या प्रकरणांवर प्रत्यक्ष सुनावणी पार पडणार आहे. एका दिवशी १० नोटीसांवर सुनावणी घेतली जाईल. सुनावणी दरम्यान संबंधित नगरसेवकांनी ठोस कागदपत्रांसह आपली बाजू मांडली नाही, तर महापालिका प्रशासन थेट 'एकतर्फी निर्णय' घेईल, असा थेट इशारा नोटीशीद्वारे देण्यात आला आहे.

# संपादकीय

## अहिल्यानगरमध्ये पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा

अन्न व औषध प्रशासन (FDA) चे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आक्रमक आणि कडक कार्यपद्धतीमुळे राज्यभरातील भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि बेकायदेशीर औषध उत्पादकांचे धाबे दणाणले आहेत. हॉटेल, दूध डेअरी आणि खाद्यपदार्थ निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर एफडीएने कारवाईचा धडाका लावला असतानाच, आता अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथे एक अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. संगमनेर शहरातील 'गोल्डन मार्केट'मधील एका दुकानावर एफडीए आणि पोलिसांनी संयुक्त छापा टाकून भारतामध्ये बंदी असलेल्या आणि पाकिस्तानात तयार झालेल्या सौंदर्यप्रसाधनांचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे केवळ प्रशासकीय वर्तुळातच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. १ ऑगस्ट रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत पाकिस्तानात निर्मिती झालेली 'गोरी ब्युटी क्रीम' आणि 'गोरी डे अँड नाईट क्रीम' विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याचे निष्पन्न झाले. जप्त करण्यात आलेल्या उत्पादनांवर थेट "Made in Pakistan / Pakistan Standard" असा स्पष्ट उल्लेख आढळला आहे. भारताची आवश्यक ती अधिकृत परवानगी नसताना आणि बेकायदेशीर मार्गाने ही उत्पादने स्थानिक बाजारात कशी पोहोचली, हा एक अत्यंत गंभीर तपासाचा विषय आहे. या प्रकरणी दुकानदार शाहीद रियाज शेख याच्याविरोधात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई केवळ बेकायदेशीर व्यापारापुरती मर्यादित नसून, थेट नागरिकांच्या आणि विशेषतः महिलांच्या आरोग्याशी जोडलेली आहे. पाकिस्तानातून बेकायदेशीरपणे येणाऱ्या अशा बहुतांश सौंदर्यप्रसाधनांमध्ये पारा (Mercury), शिसे (Lead) आणि घातक रसायनांचे प्रमाण अतिशय जास्त असल्याचे वारंवार समोर आले आहे. अशी घातक रसायने त्वचा कायमची खराब करू शकतात, कर्करोगासारखे गंभीर आजार उद्भवू शकतात आणि शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांवर दुष्परिणाम करू शकतात. केवळ तात्पुरत्या गोरापणाच्या किंवा सौंदर्याच्या मोहाला बळी पडल्यामुळे अनेक महिला अशा अनधिकृत आणि धोकादायक उत्पादनांचा वापर करतात, जे अत्यंत चिंताजनक आहे. या घटनेमुळे सीमाशुल्क विभाग (Customs) आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या दक्षतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतात बंदी असलेले पाकिस्तानी उत्पादन अहिल्यानगरच्या अंतर्गत बाजारात थेट विक्रीसाठी उपलब्ध होतेच कसे, यामागे कोणते मोठे रॅकेट किंवा तस्करीची साखळी कार्यरत आहे का, याचा मुळापासून शोध घेणे आवश्यक आहे. एफडीएने नागरिकांना आणि विशेषतः महिलांना आव्हान केले आहे की, कोणतेही सौंदर्यप्रसाधन खरेदी करताना त्याचा ब्रँड, निर्मितीचा देश आणि परवाना क्रमांक तपासूनच खरेदी करावी. प्रशासनाने अशा बेकायदेशीर आणि आरोग्यास घातक ठरणाऱ्या विदेशी उत्पादनांची पाळेमुळे पाडण्यासाठी राज्यभर व्यापक मोहीम राबवणे ही काळाची गरज बनली आहे.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती साजरी गणेश नगर वस्तीशाळा अध्यक्षपदी देविदास जाधव व उपाध्यक्षपदी सावळीराम दांडगे



**मुंडवाडी, ता. कन्नड :** येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, सामाजिक कार्य आणि समता, बंधुता व मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. त्यांच्या विचारांमुळे अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळत असून समाजातील वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास गावातील संजय बागुल ग्रामविकास अधिकारी, श्री . रमेश घनकर प्रशासक ग्रामपंचायत मुंडवाडी ,श्री रामेश्वर घनकर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक कन्नड, श्री. काकासाहेब कवडे( मा. सरपंच मुंडवाडी) श्री. बबनराव बनसोड (मा. सरपंच मुंडवाडी,) श्री. गोविंद सोनवणे (मा. सरपंच मुंडवाडी )कुमारी.पायल पवार पोस्टमन मुंडवाडी, श्रीमती,यशोदा चौरे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी 2,सर्व शालेय समिती शिक्षक वृंद तथा सदस्य,

कृषीभूषण श्री. तेजराव बारगळ (अंकुर रोपवाटिका) श्री.भगवान बारगळ मा. चेअरमन मुंडवाडी, श्री.माधवराव तायडे चेअरमन, वि वि सो मुंडवाडी, श्री. बापूसाहेब बारगळ (सामाजिक कार्यकर्ते मुंडवाडी) श्री. काकासाहेब तायडे मा. सभापती कन्नड, श्री. भागीनाथ बारगळ मा. सरपंच मुंडवाडी, श्री. रामकिसन बारगळ मा. सरपंच मुंडवाडी,

श्री.गोपालसिंग राजपूत ग्रामपंचायत सदस्य,नामदेव मगर ग्रामपंचायत कर्मचारी, श्री श्रीहरी मगर पाणी पुरवठा कर्मचारी, नितीन सातदिवे (ग्रामपंचायत ऑपरेटर) श्री. रमेश पवार, श्री.कडुबा पवार श्री. नथू तिळवन, श्री.बाळू जाधव, श्री. संजय जाधव, श्री. विजय जाधव, श्री. शिवाजी सोळसे, श्री. मच्छिन्द्र मोरे, श्री. विजय आव्हाड, श्री.विठ्ठल अंदुरे,

तसेच गावातील ग्रामस्थ, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक ऐक्य आणि विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# भारतीय शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी चिंताजनक

भारतात शिक्षण हा यशाचा सर्वात मोठा मार्ग मानला जातो. परंतु इतर देशात विद्यार्थ्यांची आवड विचारात घेऊन त्यांच्या आवडीनुसार शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे इतर देशांनी केवळ शिक्षणाच्या बळावर आपला सर्वांगीन विकास साधला आहे. परंतु आपल्या देशातील शिक्षणपद्धती ही सक्तीची आहे. ज्यामुळे शिक्षण विभागाने ठरविलेले विषय हे विद्यार्थ्यांना घ्यावेच लागते. मग त्या विषयात रस असो किंवा नसो. यामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचा -हास होतो. शिक्षण आणि बेरोजगारीचा संबंध हा एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे जो कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेवर परिणाम करतो. एका बाजूला शिक्षणाला चांगल्या रोजगाराच्या संधींचे प्रवेशद्वार मानले जाते, तर दुस-या बाजूला सुशिक्षित तरुणांमधील वाढती बेरोजगारी ही एक गंभीर चिंतेची बाब बनत चालली आहे.

अलीकडच्या वर्षांत भारत आणि जगाच्या अनेक भागांमध्ये सुशिक्षित बेरोजगारी एक मोठे आवाहन म्हणून उदयास आली आहे. याचा अर्थ असा की, उच्च शिक्षण घेऊनही मोठ्या संख्येने तरुण नोकरी शोधण्यात असमर्थ आहेत. ही परिस्थिती केवळ वैयक्तिक निराशेचे कारण बनत नाही, तर राष्ट्रीय विकासातही अडथळा आणते. बेरोजगारीची अनेक कारणे असली तरीही विद्यापीठे अनेकदा बाजारात मागणी असलेली कौशल्ये शिकवत नाहीत. अनेक शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसे ज्ञान आणि कौशल्ये मिळत नाहीत.

कौशल्य अंतराची समस्या आजचा बाजार वेगाने बदलत आहे आणि नवीन कौशल्यांची मागणी करत आहे. आपली शिक्षण प्रणाली अनेकदा या बदलत्या गरजांशी जुळवून घेत नाही. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही; दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे आहे. कमकुवत अभ्यासक्रम, अप्रशिक्षित शिक्षक आणि जुन्या शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक रोजगार बाजारासाठी तयार करत नाहीत. ही एक अशी समस्या आहे जी सुशिक्षित बेरोजगारीला आणखी वाढवते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येपैकी एक आहे, ज्याला अनेकदा 'लोकसंख्याशास्त्रीय लाभांश' म्हणून गौरवले जाते. तरीही एक विरोधाभास आहे. भारत दरवर्षी लाखो अभियंते, एमबीए आणि पदवीधर तयार करतो, पण बेरोजगारीचा दर मात्र कमी करू शकत नाही. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढत्या दरीमुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. आपण आपल्या विद्यार्थ्यांना बाजारपेठेला आवश्यक असलेली कौशल्ये देत आहोत का?

आजची शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी यांच्यात गंभीर विसंगती निर्माण झाली असून पदवीधर तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. पारंपारिक ज्ञान देणारी शिक्षणप्रणाली, प्रात्यक्षिक कौशल्यांचा अभाव आणि उद्योगांच्या बदलत्या गरजा या प्रमुख समस्या आहेत. प्रात्यक्षिक व कृतीशील शिक्षणाऐवजी केवळ पाठमोरे आणि पदवी मिळवण्यापुरते शिक्षण, कौशल्यांची तफावत, बाजारातील मागणीनुसार आवश्यक असणारे तांत्रिक व संवादात्मक कौशल्ये विद्यार्थ्यांकडे नसतात. ज्यामुळे पदवीधर तरुणांना सामावून घेणारे उद्योग व सेवा क्षेत्रातील नवीन संधी अपु-या पडत आहेत.

एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असताना उच्चशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी ही चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून पदवी किंवा व्यावसायिक शिक्षण पूर्ण करणा-या अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित नोकरी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे. शिक्षणाचा वाढता खर्च, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि कौशल्यांतील तफावत यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांवरही आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचे विविध अहवाल आणि तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

आज केवळ शाळा किंवा महाविद्यालयाची फी भरून शिक्षण पूर्ण होत नाही. शिकवण्या, स्पर्धा परीक्षा कोचिंग, डिजिटल उपकरणे, इंटरनेट, वाहतूक, गणवेश, पुस्तके, प्रोजेक्ट, वसतिगृह आणि इतर उपक्रमांवरही मोठा खर्च करावा लागतो. अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मुलांच्या शिक्षणाचा खर्च हा घर खरेदी किंवा इतर मोठ्या आर्थिक जबाबदा-यांइतकाच महत्त्वाचा बनला आहे. परिणामी अनेक पालक आपली बचत मोडतात, कर्ज घेतात किंवा इतर गरजा पुढे ढकलून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देतात.

उच्चशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असली तरी त्याच प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्माण होत नसल्याचे अहवालातून स्पष्ट होत आहे. अनेक पदवीधर महिनोनमहिने नोकरीच्या शोधात असतात. काहींना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित नसलेल्या क्षेत्रात कमी पगारावर काम स्वीकारावे लागते, तर काही जण स्पर्धा परीक्षा किंवा सरकारी नोकरीच्या तयारीत अनेक वर्षे घालवतात. यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही आर्थिक स्वावलंबन लांबणीवर पडत असल्याचे दिसून येते.

देशाचा एकूण बेरोजगारी दर तुलनेने नियंत्रित असला तरी तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः १८ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर योग्य रोजगार मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. रोजगार, शिक्षण किंवा कौशल्य प्रशिक्षण या तिन्हींपासून दूर राहणा-या तरुणांची संख्याही चिंतेचा विषय ठरत आहे. ही परिस्थिती देशाच्या लोकसंख्यात्मक लाभालाही आवाहन ठरू शकते हे नाकारता येत नाही.

उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये आणि शिक्षण संस्थांमधून मिळणारे प्रशिक्षण यामध्ये अनेकदा मोठी दरी दिसून येते. अनेक कंपन्या उमेदवारांकडे पदवी असली तरी व्यावहारिक कौशल्ये, संवाद क्षमता, डिजिटल ज्ञान किंवा उद्योगानुसार आवश्यक अनुभव नसल्याची तक्रार पुढे करतात. त्यामुळे पदवीधरांची संख्या वाढली असली तरी रोजगारक्षम उमेदवारांचे प्रमाण अपेक्षेइतके वाढलेले नाही. कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप आणि उद्योग-संस्थांमधील समन्वय वाढवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. या गरजेकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर वाढती बेरोजगारी उग्र रुप धारण करेल हे निश्चित आहे.

शिक्षणासाठी घेतलेले कर्ज, वाढत्या फी आणि नोकरीबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक दबाव वाढत आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा, अपेक्षा आणि करिअरची चिंता वाढल्याने मानसिक ताणही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. शिक्षणावर केलेली मोठी गुंतवणूक अपेक्षित परिणाम देत नसल्यास निराशा वाढू शकते. त्यामुळे शिक्षणासोबत करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांवर भर देण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

शिक्षणव्यवस्था आणि रोजगार बाजार यांच्यात अधिक सुसंगती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम अद्ययावत करणे, कौशल्याधारित प्रशिक्षण वाढवणे, इंटर्नशिपला प्रोत्साहन देणे, नवउद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण तयार करणे आणि अधिक दर्जेदार रोजगार निर्माण करणे यावर भर दिल्यास परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन न राहता रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणारी प्रक्रिया बनल्यास तरुणांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतील यात काही दुमत नाही.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
sunilshirpure776@gmail.com

# व्यसनमुक्त युवकच सक्षम भारताचे भविष्य : कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्.मणी.






**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**परभणी:**-विकसित भारत संकल्प अभियान' अंतर्गत 'Gen-Z Against Addiction – नशामुक्त युवा' या विशेष अभियानाची सुरुवात देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या शुभहस्ते झाली. या निमित्ताने दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी माननीय पंतप्रधानांनी देशभरातील युवकांशी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधत नशामुक्तीचे महत्त्व अधोरेखित केले व युवकांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला.

या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे आयोजित करण्यात आले. या थेट प्रक्षेपणाचा लाभ विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने घेतला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि मुख्यालयातील सर्व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

यावेळी सर्वांनी नशामुक्तीची शपथ घेतली तसेच विद्यापीठाच्या सलग्न आणि मान्यताप्राप्त महाविद्यालयातील ६०१२ विद्यार्थ्यांनी माय भारत (My Bharat) पोर्टलवर नोंदणी करून 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' ची प्रतिज्ञा घेवून प्रमाणपत्र प्राप्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे ऑनलाईन उपस्थित होते. मार्गदर्शनात त्यांनी युवकशक्ती ही विकसित भारताच्या निर्मितीची सर्वात मोठी ताकद असल्याचे अधोरेखित केले. व्यसनाधीनता ही केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीलाही बाधा आणणारी गंभीर सामाजिक समस्या असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी व्यसनाच्या कोणत्याही प्रकारापासून दूर राहून निरोगी जीवनशैली, सकारात्मक विचार, चारित्र्यसंपन्नता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच शिक्षणासोबतच नैतिक मूल्ये, आत्मसंयम आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासून व्यसनमुक्त, सुदृढ आणि सक्षम भारताच्या उभारणीत प्रत्येक युवकाने सक्रिय योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

प्रमुख पाहुणे तथा विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी आपल्या मार्गदर्शनात 'नशामुक्त भारत', शिस्त, वक्तशीरपणा आणि जबाबदार नागरिकत्व या विषयांवर सखोल विचार मांडले. युवा पिढीने व्यसनाधीनतेपासून दूर राहून सुदृढ व निरोगी समाजाच्या निर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक श्री. सय्यद रहेमान हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी, सुसंस्कृत जीवनशैली आणि चारित्र्यनिर्मितीचे महत्त्व पटवून दिले. उत्तम संस्कारांचा अंगीकार करून देशाचे आदर्श नागरिक बनावे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य यांनी 'नशामुक्त भारत' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, विकसित आणि सशक्त भारताच्या निर्मितीसाठी तरुणाईचे निरोगी, सुदृढ आणि व्यसनमुक्त राहणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रारंभी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे तसेच युवकांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवण्यासाठी अशा जनजागृतीपर अभियानांचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी वाईट सवयींचे नव्हे, तर चांगल्या विचारांचे, ज्ञानाचे आणि समाजोपयोगी कार्याचे व्यसन जडवावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमास अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर, उद्यानविद्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विश्वनाथ खंदारे तसेच सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

ऑनलाईन थेट प्रक्षेपण डॉ. संतोष फुलारी यांनी यशस्वीरीत्या हाताळले. सूत्रसंचालन तसेच उपस्थितांचे आभार प्रदर्शन डॉ. संघर्ष श्रृंगारे यांनी मानले.

या अभियानाला विद्यापीठातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुभाष विखे, डॉ. प्रविण घाडगे, डॉ. शंकर पुरी, डॉ. बी. एम. कलालबंडी, डॉ. धीरज पाथ्रीकर आणि डॉ. खंडागळे, तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय व कृषी महाविद्यालय, परभणी येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देवगिरी महाविद्यालयात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या सहकार्याने 'AI Beyond' सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**





**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पस यांच्या सहकार्याने 'AI Beyond' सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा २०२६–२७ उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडली. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि अवकाश विज्ञानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमने कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्टे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व अवकाश तंत्रज्ञानातील भविष्यातील संधी यांची ओळख करून देत केली.

यानंतर 'AI Beyond' या विषयावर अफशान खान यांनी प्रमुख वक्त्या म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलतत्त्वे, शिक्षण, आरोग्य, उद्योग, संशोधन, ऑटोमेशन तसेच भविष्यातील करिअरच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली.

सेमिनारमधील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या 'Meditation App'चे सादरीकरण होय. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने मानसिक आरोग्य आणि तणाव व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या या ॲपची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

त्यानंतर उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. वंदना जाधवपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रियांका साह यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले, तर पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसचे Outreach Officer विकास राजपूत यांनी विद्यार्थ्यांना उपग्रहाची रचना, कार्यपद्धती, उपग्रह संप्रेषण, अवकाश मोहिमा आणि आधुनिक अवकाश तंत्रज्ञान याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने उपग्रहांची मॉडेल्स तयार करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना Satellite Model Making Website ची माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात एकूण 170 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रवी पाटील यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, वैज्ञानिक संशोधन, नवोपक्रम आणि अवकाश संशोधनाचा स्वीकार करून भविष्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन केले.

उपप्राचार्य प्रा. अरुण काटे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे, शिक्षकांच्या अथक परिश्रमांचे तसेच पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमच्या मोलाच्या सहकार्याचे विशेष कौतुक केले. त्यांनी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले.

# पीएम श्री जि.प. हायस्कूल लाडसावंगीचा कोडिंगमध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक

## जिल्हास्तरीय कॉम्प्युटर सायन्स हॅकेथॉनमध्ये रोहिणी डवणे व आलिया शेख यांची चमक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद शिक्षण विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, मूर्ती ट्रस्ट आणि कोड टू एनहांस लर्निंग संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय कॉम्प्युटर सायन्स हॅकेथॉन उत्सवात पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल, लाडसावंगी येथील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल एनराईस बाय सयाजी येथे हा हॅकेथॉन मोठ्या उत्साहात पार पडला. जिल्ह्यातील जिल्हा परिषद व शासकीय आश्रमशाळांमधील ग्रामीण व शहरी भागातील एकूण ४,३१५ विद्यार्थ्यांनी पहिल्या टप्प्यात नोंदणी केली होती. त्यापैकी ३,२३५ विद्यार्थ्यांनी अनप्लग्ड (कंप्युटरशिवाय) चॅलेंज यशस्वीरीत्या पूर्ण केले. या विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे १५ शाळांतील ३० विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय हॅकेथॉनसाठी निवड करण्यात आली.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्क्रॅच प्लॅटफॉर्मवर कोडिंगच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्यांवर आधारित गेम, ॲनिमेशन आणि ॲप्लिकेशन तयार केले. विमान प्रवासातील सुरक्षितता, जिल्हा परिषद शाळांमधील घटती विद्यार्थीसंख्या, कचरा व्यवस्थापन, बेरोजगारी, ऑनलाइन गेमिंगपासून सावधानता आणि सौरऊर्जेचा वापर अशा विषयांवर त्यांनी प्रभावी सादरीकरण केले. या प्रक्रियेत चिकित्सक विचार, संवाद कौशल्य, सहकार्य आणि समस्या निवारण यांसारख्या २१व्या शतकातील कौशल्यांचा



प्रभावी वापर करण्यात आला.

स्पर्धेत पीएम श्री जि.प. हायस्कूल, लाडसावंगी यांनी प्रथम क्रमांक, तर जि.प. प्राथमिक शाळा, मांजरी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. विजेत्या शाळांना प्रत्येकी तीन लॅपटॉप, फिजिकल कम्प्युटिंग किट, पुस्तके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. उर्वरित विजेत्या शाळांनाही प्रत्येकी तीन लॅपटॉप, पुस्तके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. एकूण ४५ लॅपटॉप आणि २ फिजिकल कम्प्युटिंग किटचे वितरण करण्यात आले.

लाडसावंगी शाळेच्या संगणक शिक्षक रघुनाथ काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. रोहिणी बळीराम डवणे आणि कु. आलिया इरफान शेख या विद्यार्थिनींनी स्पर्धेत सहभाग घेत उत्कृष्ट यश संपादन केले.

कार्यक्रमास कोड टू एनहांसचे सीईओ इरफान ललानी, उपशिक्षणाधिकारी श्रीमती गीता तांदळे, डॉ. सोज्वल जैन, उद्धव वायाळ, ज्ञानेश्वर रोडगे, धर्मिष्ठा पटेल, अश्विनी मधाळे, रविराज खिल्लारी, भगवान तुपे, गणेश मालघन, पंकज धुराडे, पूजा जाधव, प्रीती मेश्राम आणि आकाश चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पारितोषिकांचे वितरण केले.

या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित साहेब, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण तसेच अश्विनी लाटकर, राकेश साळुंके, अरुण शिंदे, चेतन कांबळे, नीता श्रीश्रीमाळ, सीमा मेहेत्रे, दिपाली थावरे, सिताराम पवार, संगीता सावळे, जालम चौरे, मनीषा वाशिंबे, कल्पना पदकोंडे, दिलीप सिरसाठ, श्रीराम केदार, धनराज कांबळे आदींनी विजेत्या विद्यार्थिनी, शिक्षक व शाळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशासाठी मुख्याध्यापक गोरखनाथ नजन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश मोरे, आनंदराव माघाडे, छाया वाघ, शिवराज मोहिते, अलका सोनवणे, गणेश अवचार, नामदेव पवार, साधना पाटील, धुरपती कदम, संगीता कौलकर, वंदना केदारे, सारिका जैन, संगीता लेमटे, सुनिता वाघ, अमोल सोनटक्के, उत्तम कोळेकर, सचिन धस, सुवर्णा टाक, राजश्री पंडित, प्रज्ञा जाधव, दिनेश कुलकर्णी, राजू बावस्कर, विनोद चव्हाण, अनिल वाणी आणि सांडूमामा यांनी विशेष परिश्रम घेतले.

## गौरक्षक सेना मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्षपदी श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री सचितानंद सरस्वती स्वामी महाराज उर्फ अशोक पवार यांची निवड

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी:**-श्री संकट चतुर्थी व मैत्री दिन व फ्रेंडशिप डे निमित्ताने गौरक्षक सेना महाराष्ट्रामध्ये विस्तारम चालू आहे यामध्ये मराठवाडा विभागातून वरिष्ठ उपाध्यक्षपदीश्री श्री 1008 महामंडलेश्वर सच्चीदानंद सरस्वती महाराज उर्फ अशोक पवार यांची निवड नियुक्ती करण्यात आली ही निवड गौरक्षक सेना सनातन रक्षक सेना फाउंडेशन च्या संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती अनुरमाताई सिंह यांच्या आदेशाने तथा गौरक्षक सेना राष्ट्रीय अध्यक्ष सुनीलभाई सेजाणी यांच्या पुढाकारातून आणि गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्या शिफारशीनुसार मराठवाडा विभागातून परभणी सह मराठवाड्यात सामाजिक धार्मिक अध्यात्मिक गो संवर्धन पत्रकारिता मीडिया सर्व चळवळीत काम करणारेश्री श्री 1008 महामंडलेश्वर सचिद्दानंद सरस्वती महाराजउर्फ अशोक पवारमहाराज गाव पूर्ण तालुका पूर्णा जिल्हा परभणी मराठवाडा विभागाचे प्रदेश उपाध्यक्षपदी यांची निवड नियुक्ती करण्यात आली या निवडीबद्दल महाराष्ट्र गौरक्षक सेना महाराष्ट्र परभणी च्या वतीने जय गोमाता जय भारत माता अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली.

या नियुक्ती बद्दल गोरक्षक सेनाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नितीन गोगलगावकर मराठा महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष धाराजी भुसारे समरसता मंच चे अनंतराव जोगदंड डॉ हातागले जिल्हा संयोजक मोतीराम पौळ वैभव आसोले कमलाकर क्षीरसागर पवार काका भारत जमरे किरण शिंदे प्रभाकर प्रधान सुनील रणबावले श्री श्री 1008महामंडलेश्वर डॉ.विशालनंद सरस्वती.श्री श्री 1008. महामंडलेश्वर डॉ प्रदीप फाले महाराज महामंडलेश्वर रामानंद सरस्वती महाराज संभाजी नगर अर्जुन शिंदे अमोल कांबळे शिवा गायके आदिनी अभिनंदन केले.

# परदेश अभ्यास दौरा योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन; परभणी जिल्ह्यास पाच शेतकऱ्यांचा लक्षांक

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी व शेतीत नाविन्यपूर्ण तंत्रांचा अवलंब करता यावा, यासाठी राबविण्यात येणाऱ्या देशाबाहेरील अभ्यास दौरे – राज्य पुरस्कृत योजना (सन २०२६-२७) अंतर्गत परभणी जिल्ह्यास ५ शेतकऱ्यांचा लक्षांक प्राप्त झाला आहे. या योजनेसाठी इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी दि. १३ ऑगस्ट २०२६ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त प्रस्तावांमधून सोडत पद्धतीने व ज्येष्ठता यादीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. निवड प्रक्रियेत किमान एक महिला शेतकरी तसेच किमान एक केंद्र अथवा राज्य कृषी पुरस्कारप्राप्त किंवा पीक स्पर्धा विजेता शेतकरी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

या अभ्यास दौऱ्यासाठी युरोप तसेच चीन या देशांची निवड करण्यात आली आहे. युरोपमध्ये फलोत्पादन, सेंद्रिय शेती व दुग्धोत्पादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करता येणार असून, चीनमध्ये विविध कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढीसाठीची आधुनिक साधने व कृषी प्रदर्शनांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार स्वतः शेतकरी असणे, त्याच्या नावावर अद्ययावत ७/१२ व ८-अ उतारा, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, वैध पासपोर्ट, आधार कार्ड, शिधापत्रिका, तसेच एमबीबीएस डॉक्टरांचे शारीरिक तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय दौऱ्याच्या दिवशी किमान २५ वर्षे पूर्ण असावे. तसेच अर्जदार शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खासगी सेवेत नसावा तसेच यापूर्वी शासनाच्या अर्थसहाय्याने विदेश अभ्यास दौरा केलेला नसावा.

इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी आयुक्तालयाने निर्धारित केलेले प्रपत्र क्रमांक १, २, ३ व ५ परिपूर्ण भरून, सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत. शेतकरी निवडीचे अंतिम अधिकार राज्यस्तरीय समितीकडे राखीव असून, पात्र शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी यांनी केले आहे.

## आरटीओ कार्यालय परिसरात 80 वृक्षांची लागवड; डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा सामाजिक उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा (ता. अलिबाग) यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या राज्यव्यापी वृक्षलागवड व संवर्धन अभियान अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) करोडी, छत्रपती संभाजीनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले. गुरुवारी (दि. २) आरटीओच्या मुख्य इमारत परिसरात कडुलिंब, बकुल, करंजी, वड आदी विविध प्रजातींच्या ८० वृक्षांची लागवड करण्यात आली.



सकाळी ९ ते दुपारी १२.३० या कालावधीत झालेल्या या उपक्रमात छत्रपती संभाजीनगर व बजाजनगर परिसरातील १०० ते १२० श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. याच अभियानाअंतर्गत प्राथमिक शाळा रांजणगाव आणि वडगाव कोल्हाटी येथेही वृक्षलागवड व संवर्धन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक शिंदे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी कुमठाळे, अक्षय येवले, मोटार वाहन निरीक्षक मोहकरे तसेच दीपा ताम्हाणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## जितो लेडीज विंगतर्फे 'उडान' लाइफस्टाईल प्रदर्शनाचे 5 व 6 ऑगस्टला आयोजन




हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जितो लेडीज विंग, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने राखी व तीज विशेष 'उडान – लाइफस्टाईल एक्झिबिशन'च्या चौथ्या पर्वाचे आयोजन ५ व ६ ऑगस्ट २०२६ रोजी हॉटेल अतिथी, जालना रोड येथे करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता विविध क्षेत्रातील मान्यवर महिला पदाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य कन्व्हेनर सौ. डिम्पल पगारिया यांच्या हस्ते होणार आहे.

जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा प्रिया मुथा यांनी सांगितले की, कोलकाता, दिल्ली, मुंबई, इंदूर, रायपूरसह देशभरातील ७५ हून अधिक नामांकित प्रदर्शक या प्रदर्शनात सहभागी होत आहेत. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने साधार्मिक महिलांसाठी स्टॉल्स प्रायोजित करण्यात आले असून नागरिकांना एकाच छताखाली दर्जेदार वस्तूंची खरेदी करता येणार आहे.

प्रदर्शनात फॅशन ज्वेलरी, डिझायनर साड्या, एथनिक व वेस्टर्न परिधान, किड्स वेअर, पर्सेस, होम डेकोर, गिफ्ट हॅम्पर्स, ब्युटी व लाइफस्टाईल उत्पादने, राखी-तीज विशेष कलेक्शन तसेच विविध गृहउद्योगांची उत्पादने उपलब्ध राहतील.

या उपक्रमाच्या इव्हेंट हेड म्हणून डॉ. प्रियांका संघवी व सारिका सेठी कार्यरत असून जितो लेडीज विंगच्या सर्व पदाधिकारी, सदस्य आणि जितो चॅप्टरचे अध्यक्ष अनिल संचेती, आशीष सकलेचा व रवींद्र खिवसरा यांच्या सहकार्याने प्रदर्शनाचे नियोजन करण्यात आले आहे. या भव्य प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जिंतूर तालुक्यात ग्राहक पंचायतीच्या सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जिंतूर, प्रतिनिधी :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या ऑनलाईन सदस्य नोंदणी अभियानाला जिंतूर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुकास्तरीय बैठकीत पदाधिकाऱ्यांनी स्वतःची ऑनलाईन नोंदणी करून अभियानाचा शुभारंभ केला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे होते. यावेळी तालुकाध्यक्ष मंचक देशमुख, सचिव सचिन रायपत्रीवार, शहराध्यक्ष दिलीप देवकर, मार्गदर्शक चंद्रकांत गवळी, महिला अध्यक्ष आशाताई खिल्लारे, उपाध्यक्ष संदीप माहूरकर, ॲड. रमेश वाकळे, प्रल्हाद टाकरस आदी उपस्थित होते. पुढील महिनाभर गावपातळीवर व्यापक सदस्य नोंदणी अभियान राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. "गाव तिथे ग्राहक पंचायत, घराघरात ग्राहक जागृती" हा संकल्प प्रत्यक्षात आणत जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून जिंतूर तालुक्याला देवगिरी प्रांतात प्रथम क्रमांकावर आणण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष मंचक देशमुख यांनी केले.

## फर्दापूर परिसरात वन्यप्राण्यांचा उच्छाद रोही हरणांकडून पिकांची नासाडी वनविभागाने तात्काळ पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी

**फर्दापूर :** फर्दापूर परिसरामध्ये सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे शेतातील पिकांना जीवदान मिळाले असून पिके चांगलीच तरारून आली आहेत मात्र निसर्गाने साथ दिलेली असताना आता बळीराजासमोर वन्यप्राण्यांचे नवे संकट उभे राहिले आहे रोही नीलगाय हरीण आणि रानडुक्कर यांसारख्या जंगली प्राण्यांनी शेतातील उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी करण्यास सुरुवात केल्याने शेतकरी पुरते हवालदिल झाले आहेत

नुकसानीचे स्वरूप आणि शेतकऱ्यांची व्यथा

कपाशी तूर आणि मक्याचे शेंडे फस्त रात्रीच्या वेळी शेतात घुसून रोही आणि हरणे कपाशी तूर आणि मका यांसारख्या कोवळ्या पिकांचे शेंडे खाऊन टाकत आहेत

रानडुकरांकडून मुळासकट नासाडी एकीकडे रोही शेंडे खात आहेत तर दुसरीकडे रानडुकरे थेट पिकांच्या मुळाशी उकरून रोपे मुळासकट नष्ट करत आहेत

शेतकरी आरिफ खा यांचे मोठे नुकसान फर्दापूर येथील शेतकरी आरिफ खा सलिम गट नंबर २४४ यांच्या शेतात रात्रीच्या वेळी रोहींच्या कळपाने घुसून कपाशी पिकाचे अतोनात नुकसान केले आहे शेतातील कोवळ्या कपाशीच्या रोपांजवळ



प्राण्यांच्या पायांचे खोलवर ठसे आणि उकरलेली माती स्पष्टपणे दिसून येत असून रोपांचे शेंडे खाल्ल्याचे उघडकीस आले आहे

वनविभागाकडे कारवाईची मागणी

अहोरात्र काबाडकष्ट करून जगवलेली पिके डोळ्यादेखत नष्ट होत असल्याने परिसरातील शेतकरी या जंगली प्राण्यांच्या त्रासाला फार वैतागले आहेत वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ या नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करावी आणि नुकसानीचे पंचनामे करावेत अशी आर्त मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे पंचनामे झाल्यानंतरच प्रशासनाला या नुकसानीची दाहकता दिसेल आणि शेतकऱ्यांना योग्य ती भरपाई मिळू शकेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

## इद्रिस मुलतानी यांनी सावळदबारा येथे कार्यकर्त्यांची बैठक घेतली



**सावळदबारा प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी दि. १ ऑगस्ट रोजी सावळदबारा येथे कार्यकर्त्यांची बैठक घेतली. विविध योजनांची माहिती दिली. तसेच फर्दापूर-सावळदबारा परिसरातील गावांना भेटी देत नागरिक व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सावळदबारा येथे या बैठकीत त्यांनी पक्ष संघटना बळकटीकरण, आगामी कार्यक्रम तसेच विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सावळदबारा येथे बैठकीत इद्रिस मुलतानी यांनी विविध योजनांची माहिती दिली आहेत

सावळदबारा येथे भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या हस्ते भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांचा सत्कार करण्यात आला.

भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते म्हणाले, फर्दापूर जिल्हा परिषद गटात ७७ नवीन डीपींना मंजुरी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्यामुळे फर्दापूर जिल्हा परिषद गटातील १८ गावांमध्ये ७७ नवीन डीपींना मंजुरी मिळाली असून, सुमारे ४ हजार शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहेत.

सावळदबारा येथे यावेळी व्हिजेएटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, सभापती उत्तम चव्हाण, फर्दापूर पं. स. सदस्य राहुल राठोड, संस्थाध्यक्ष भावराव कोलते, एन. आर. कोलते, लवकेश जाधव, संजय चव्हाण, रामचंद्र चिमणकर, मनोज बुढाळ, शंकर अवसरमोल, प्रल्हाद नरोटे, पंढरी साबळे, दिनकर बोबडे, रहिम पठाण, देव आप्पा पंधाडे, एकनाथ सपाटे, स्वराज डापके, विनोद टिकारे, दीपक मानकर, दिनकर शिपल्कर, शाताराम खराटे, मयूर महाजन आदी उपस्थित होते.

## राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई, 02 ऑगस्ट :** राज्यात मान्सूनचा जोर पुन्हा एकदा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने पुढील तीन दिवसांसाठी राज्यातील विविध भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ३ ऑगस्ट रोजी कोकण आणि गोवा भागात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर तसेच अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि वर्धा या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

३ ऑगस्ट रोजी रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे. कोकण विभागात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून काही भागात जोरदार सरी कोसळू शकतात. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. विदर्भात काही ठिकाणी पाऊस तसेच मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**सिल्लोड :** येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त १ ऑगस्ट रोजी प्रेरणादायी वक्तृत्व स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली, याप्रसंगी विद्यार्थ्यांनी दोन्ही महान नेत्यांच्या कार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक निशांत म्हस्के व प्रमुख पाहुणे गजानन डमाळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने व महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी आपल्या कणखर भाषणातून टिळकांचा स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आह हा नारा आणि अण्णाभाऊंच्या साहित्यातील प्रखर वास्तववादी विचार मांडले. तर काही विद्यार्थ्यांनी धारण केलेली लोकमान्य टिळक व



शाहीर अण्णाभाऊंची वेशभूषा स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरली.

या वक्तृत्व स्पर्धेत शाळेतील प्राथमिक गटातून प्रथम समृद्धी अग्रवाल, द्वितीय समृद्धी शेलार, तृतीय क्रमांक ऋतिका पंडित, काजल कांबळे यांनी मिळविला. तर माध्यमिक गटातून प्रथम मृणाल अढायके, द्वितीय अनुजा जाधव, तृतीय क्रमांक समृद्धी इंगोले हिने मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुस्तके देऊन गौरविण्यात आले.

तर सहभागी स्पर्धक श्रावणी नाकिरे, काजल कांबळे, अनुजा जाधव, श्रुतिका ठाले, गौरी घोडके, वैष्णवी सिरसाठ, पायल मरकडे, विदेशा साळवे, तनुष्का शेजुळ, परी कुशवाह या विद्यार्थिनींनी अत्यंत प्रभावी आणि ओजस्वी भाषणांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. तसेच याप्रसंगी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी रितेश कुदळ, रोहन शेख यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे गजानन डमाळे यांनी विद्यार्थ्यांच्या भाषणांचे कौतुक करत महापुरुषांच्या विचारांवर चालण्याचा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात निशांत म्हस्के दोन्ही महापुरुषांच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज अधोरेखित केली आणि विद्यार्थ्यांच्या कौतुकास्पद प्रयत्नांचा गौरव केला. निष्पक्ष आणि अचूक मूल्यमापन परीक्षकांचे काम रमेश सोनवणे, गजानन दौड यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मृणाल अढायके, श्रेया गायकवाड या विद्यार्थिनींनी केले, तर आभार रमेश परदेशी यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, भिकन आगारे, अंगद काळे, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, अमोल तातू, गजानन दौड, डॉ. रमेश काळे, पंकज सावंत, संगीता तायडे, संगीता काळे, नम्रता वडमारे, शैलेश मोरे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# खुलताबाद पंचायत समितीचे गट विकास अधिकारी प्रकाश नाईक कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान आणि सेवापूर्ती सोहळा

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी :** खुलताबाद तालुक्यासाठी प्रशासकीय सेवेत आपल्या प्रामाणिक आणि कर्तव्याशी एकनिष्ठ कारकिर्दीची यशस्वी वाटचाल पूर्ण करून, गटविकास अधिकारी वर्ग १ . प्रकाश वसंतराव नाईक शासनाच्या नियमाप्रमाणे दि ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त सन्मान सोहळा

प्रकाश. नाईक आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकिर्दीत खुलताबाद पंचायत समितीमध्ये शासकीय कामासाठी आपल्या कामानिमित्त येणाऱ् नागरिकांना सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आणि कायम स्मरणात राहणारे आहे

(पंचायत समिती स्तरावर अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विहिरी. गाय गोठे रस्ते शेवगा लागवड. कृषी विभाग मार्फत विद्या योजना. घरकुल. समाज कल्याण विभाग अंतर्गत राबवले जाणारे योजना. बचत गट अपंगासाठी असलेले विविध योजना या प्रभावीपणे शासनाच्या नियमाप्रमाणे राबवून लाभार्थ्यांना शासकीय योजने चा लाभ मिळवून




देण्यासाठी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत लाभार्थी मेळावा शिबिर घेऊन व योजनेचे मंजूर प्रमाणपत्र लाभार्थ्यांना वाटप करून एक आदर्श निर्माण केला यात एम आर ई जी एस कार्यक्रम अधिकारी अभिजीत गायकवाड . विस्तार अधिकारी दीपक बागुल. मंगेश शिंदे प्रतिभा कांबळे शिवाजी मते. रावते मॅडम यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी विशेष सहभाग नोंदवला )

एक शिस्तप्रिय, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारा आणि तळमळीने काम करणारे अधिकारी म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख ग्रामीण भागातून कामासाठी येणाऱ्या नागरिकांशी निर्माण केली. प्रशासकीय सेवेत असताना त्यांनी अनेक लोक उपयोगी विकास कामे यशस्वीपणे मार्गी लावली आणि नेहमीच सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

(छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे. प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी योग्य समन्वयाने काम केल्यास शासनाच्या योजनांचा कशाप्रकारे लाभ ग्रामीण भागातील सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या विविध योजना लाभ मिळतो , याचे उत्तम आणि अनुकरणीय उदाहरण म्हणजे प्रकाश वसंतराव नाईक खुलताबाद पंचायत समिती गट विकास अधिकारी म्हणून कारकीर्द आहे. व आशा कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांचा आम्हालाच अभिमान आहे असे आपल्या मनोगत व्यक्त केले यावेळी. प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद बांधकाम सभापती सचिन गराड खुलताबाद पंचायत समितीचे उपसभापती मंदाबाई बद्रीनाथ वाकळे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संदीप निकम पाटील यांच्यासह अधिकारी सरपंच आदी उपस्थिती होते

# गोदावरी नदी पूर रेषा सर्वेक्षणला अंतिम मंजुरी

## आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या पाठपुराव्याला यश आठ कोटीचा निधी मंजूर

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** संपूर्ण मराठवाड्याची गोदामाय व परभणी जिल्ह्याचे जीवन वाहिनी असलेली गोदावरी नदीच्या पूर परिस्थितीचा वैज्ञानिक अभ्यास करून भविष्यातील आपत्ती व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्याच्या दूरदृष्टीने राज्य शासनाने गोदावरी नदी पूर रेषा सर्वेक्षणाचा निर्णय घेतला असून यासाठी आ डॉ रत्नाकर गुट्टे यांनी केलेली सतत ची मागणीव केलेला पाठपुरावा याला अखेर यश आलेच.

अतिशय महत्त्वकांक्षी सर्वेक्षणासाठी आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभागात मार्फत आठ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे परभणी जिल्ह्यातील काही तालुक्यातील व गंगाखेड तालुका विधानसभा मतदारसंघातील वाहणाऱ्या गोदावरी नदीला दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे गोदाकाठावरील अनेक गावांना पूर परिस्थिती निर्माण होऊन जीवितहानी व वित्तहानी समस्या निर्माण होत असून यामुळे निर्माण होणाऱ्या गोदावरी नदीकाठच्या वस्ती शेती सार्वजनिक मालमत्ता व मूलभूत सुविधा वर मोठा परिणाम होत असल्याने ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन गोदावरी नदीच्या पूर रेषेचे शास्त्रीय सर्वेक्षण करण्याची मागणी आ. डॉ. गुट्टे सतत राज्य शासनाकडे लावून धरले व त्याचा सतत पाठपुरावा केला त्यांच्या मागणीला राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन गोदावरीच्या दोन्ही काठावरील पूर प्रणव क्षेत्रातील अचूक मोजमाप सर्वेक्षणाला मंजुरी दिली असून या संरक्षणाच्या माध्यमातून गोदावरी नदीला आलेला पूर कोणत्या मर्यादेपर्यंत पोहोचू शकतो व कोणती गावे धोक्याच्या क्षेत्रात येऊ शकतात व भविष्यातील संभाव्य धोके कोणते असू शकतात त्यांचा तांत्रिक व शास्त्रीय अभ्यास करून या पूर परिस्थिती नियोजन अचूकपणे करणे प्रशासनाला शक्य होणार असून यात विशेष बाब म्हणजे गोदाक्का आठवतील नागरिकाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे हे सर्व क्षमतेवर नकाशे तयार करण्यापूर्वी मर्यादित राहणार नसून त्यामुळे गोदावरी काठावरील वस्ती शाळा सार्वजनिक इमारती आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणा चे जोखीमिचे मूल्यांकन करण्यात येणार असून भविष्यातील विकास आराखड्याला नवीन दिशा मिळणार असल्याचे आ डॉ गुट्टे यांनी सांगितले.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ईसीएमओ मशीनची सुविधा सुरू

## अत्यवस्थ हृदय व फुफ्फुसाच्या रुग्णांसाठी जीवनदायी उपचार उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर :** गंभीर हृदयविकार, फुफ्फुस निकामी होणे, तीव्र न्यूमोनिया, सेप्सिस, सर्पदंश विशिष्ट विषबाधा ,हृदयविकाराचा झटका किंवा जटिल हृदय शस्त्रक्रियेनंतर अत्यवस्थ झालेल्या रुग्णांना जीवनदान देण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ईसीएमओ (एक्स्ट्राकॉर्पोरियल मेम्ब्रेन ऑक्सीजनेशन) मशीनची सुविधा सुरू करण्यात आली आहे. डॉ मनीष पुराणिक, हृदय शल्यचिकित्सक यांनी सांगितले की



ईसीएमओ ही अत्याधुनिक जीवनरक्षक प्रणाली असून, रुग्णाचे हृदय किंवा फुफ्फुसे तात्पुरती कार्य करू शकत नसतील तर हे यंत्र कृत्रिमरीत्या रक्ताला ऑक्सिजन पुरवून शरीरात परत पाठवते. त्यामुळे हृदय व फुफ्फुसांना विश्रांती मिळून त्यांना बरे होण्यासाठी वेळ मिळतो. ही उपचारपद्धती अत्यंत गंभीर आणि निवडक रुग्णांसाठी वापरली जाते. हृदय व फुफुसांच्या गंभीर आजारांमध्ये ह्या अवयवांना मदत करून त्यांची अधिकची झीज ईसीएमओ च्या वापराने टाळता येऊ शकते.

यावेळी मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे म्हणाले, "मराठवाड्यातील रुग्णांना अत्याधुनिक आणि वेळेवर उपचार मिळावेत, हा आमचा प्रयत्न आहे. ईसीएमओ सारखी सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना उपचाराची नवी आशा मिळणार आहे." हृदयरोग, क्रिटिकल केअर, कार्डिओथोरॅसिक सर्जरी, भूलतज्ज्ञ, परफ्युजनिस्ट, प्रशिक्षित नर्सिंग व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या अनुभवी टीमद्वारे ही सेवा 24x7 उपलब्ध राहणार आहे.

# केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांची संभाजीनगरला भेट; पर्यटन विकासाला गती देण्याचे आश्वासन

## अजिंठा-वेरूळ पर्यटन, पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवेबाबत सकारात्मक चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी शनिवारी छत्रपती संभाजीनगरला भेट देऊन शहरातील पर्यटन विकासाच्या विविध मुद्द्यांचा आढावा घेतला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

> **"छत्रपती संभाजीनगर हे जागतिक दर्जाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे शहर आहे. अजिंठा-वेरूळसारख्या जागतिक वारसा स्थळांचा विकास आणि शहराला आंतरराष्ट्रीय विमानसेवा उपलब्ध झाल्यास पर्यटन, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याने शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे."**
>
> **जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे**

यावेळी माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजपचे प्रदेश सचिव प्रवीण घुगे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत अजिंठा-वेरूळ या जागतिक वारसा स्थळांच्या पर्यटनवृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना, छत्रपती संभाजीनगरमधील पर्यटनाच्या पायाभूत सुविधांचा विकास तसेच शहरासाठी आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पर्यटन विकासाबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. केंद्र सरकारच्या माध्यमातून आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करून पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी लवकरच ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

संभाजीनगर दौऱ्यादरम्यान केंद्रीय मंत्री शेखावत यांनी श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर येथे दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली.

भेटीच्या शेवटी भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी केंद्रीय मंत्री शेखावत यांचे आभार मानले. यावेळी भाजपचे सचिन गुगळे, योगेश वाणी यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# जल जीवन मिशन कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याचे मा. औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छ.संभाजीनगर,२- जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागातील जल जीवन मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. ३० जुलै २०२६ रोजी डॉ नंदलाल लोकडे आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकेत झालेल्या सुनावणीत, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करावे तसेच मा. न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये, असे निर्देश न्यायालयाने राज्य शासनाला दिले.

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागांतर्गत कार्यरत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या जिल्हा व तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२५ पासून नियमित वेतन मिळालेले नाही. नियमित वेतन तसेच इतर प्रलंबित मागण्यांसाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून शासनाकडे वेळोवेळी निवेदने सादर केली होती. तसेच मुंबईतील शिवाजी पार्क येथे आंदोलनही करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही प्रश्न निकाली न निघाल्याने न्यायालयाचे दार ठोठावण्यात आले.

याप्रकरणी जिल्हा परिषद, नांदेड येथील जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागातील डॉ. नंदलाल लोकडे व इतर कर्मचाऱ्यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वतीने विधीतज्ञ गौतम कर्णे यांनी कर्मचाऱ्यांना अनेक महिन्यांपासून वेतन मिळत नसल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवासुरक्षेबाबतही न्यायालयाकडे मागणी करण्यात आली. शासनाच्या वतीने विधीतज्ञ ए. बी. गिरसे यांनी बाजू मांडली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करण्यात यावे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये, असे आदेश दिले.

या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव, जल जीवन मिशन-स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक तसेच संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला वेतनाचा प्रश्न न्यायालयाच्या आदेशानंतर किती लवकर मार्गी लागतो, याकडे राज्यातील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# नांदेड विभागाच्या रेल्वेत आढळले 339 फुकटे प्रवासी

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** केंद्र सरकारची रेल्वे ही आपलीच रेल्वे समजून काही फुकटे प्रवासी प्रवास करत असतात त्यांच्यावर नजर ठेवून दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने विना तिकीट व अनियमित प्रवाशाला आळा घालण्यासाठी दिनांक 31 जुलै शुक्रवार रोजी विशेष मॅसीव्ह तिकीट तपासणी अभियान राबविले होते यामध्ये सकाळी पाच ते सायंकाळी साडेआठच्या दरम्यान सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली होती या मोहिमेत 339 फुकट्या प्रवाशावर कारवाई करून दोन लाख 33 हजार दोनशे रुपयांचा दंड वसूल करण्यात आला या मोहिमेत 24 गाड्यांची तपासणी करण्यात आली यामध्ये 28 तिकीट तपासणीस कर्मचारीतसेच रेल्वे सुरक्षा दलातील( आर पी एफ ) कर्मचाऱ्यांनी सहभागी झाले होते या तपासणी दरम्यान 339 प्रकरणे हाताळली यामध्ये विना तिकिट व अनिमित्त प्रवास करणारे फुकटे प्रवासी यांच्याकडून दोन लाख तेहतीस हजार दोनशे रुपये दंड वसूल करण्यात आला त्यामध्ये 226 विना तिकिट प्रवाशाकडून दोन लाख 685 रुपये व 20 अनियमित प्रवाशाकडून 15885 रुपये व बुक न केलेल्या सामान प्रकरणातून सोळा हजार आठशे रुपये महसूल दंड वसूल करण्यात आला यामध्ये वैद्य टिकीट धारकांना सुरक्षित व सुलभ प्रवासासाठी सुविधा उपलब्ध करून देणे व जमा केलेल्या महसुलाचे संरक्षण करणे तिकीट असं प्रवासाबाबत जनजागृती करणे या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले अशा प्रकारच्या विशेष तिकीट मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असून प्रवाशांनी वैद्य टिकीट घेऊनच प्रवास करावा असे आवाहनही रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले .

# भोंदू खरातला सात दिवसांची पोलिस कोठडी; न्यायालयाचा सात दिवसांच्या कोठडीचा आदेश

**शिर्डी (प्रतिनिधी ) :** समता सहकारी पतसंस्थेतील कथित बोगस खाते प्रकरणातील प्रमुख आरोपी भोंदू खरात याला शनिवारी न्यायालयाने सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. सुनावणीदरम्यान बचाव पक्ष आणि सरकारी पक्षात जोरदार युक्तिवाद झाला.

बचाव पक्षाने न्यायालयात मांडले की, आरोपीने कोणतीही बनावट कागदपत्रे वापरून कर्ज घेतलेले नाही. संबंधित खात्यांतील रकमेवर कोणत्याही खातेदाराने दावा केलेला नसून व्यवहारांबाबतही कोणतीही तक्रार नाही. खातेदारांचे आर्थिक नुकसान अथवा प्रतिष्ठेला धक्का बसल्याचेही निष्पन्न झालेले नाही. फिर्यादीचे नेमके नुकसान काय झाले, हेही स्पष्ट करण्यात आलेले नाही, असा दावा बचाव पक्षाने केला.

याशिवाय, चार महिन्यांपासून तपास सुरू असताना पोलिसांनी काय कारवाई केली, असा सवाल उपस्थित करण्यात आला. पतसंस्थेच्या व्यवस्थापकाविरुद्धही गुन्हा दाखल असून त्याच्या चौकशीतून अनेक बाबी समोर आल्या असत्या. मात्र, व्यवस्थापकाला मोकळे सोडून आरोपी भोंदू खरात यांना ओढूनताणून या प्रकरणात गोवले जात असल्याचा आरोप बचाव पक्षाने केला.

# आदिशक्ती अभियानात घोसला ग्रामपंचायतीची सोयगाव तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक

## 4 लाख रुपयांचे बक्षीस

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**सोयगाव, दि.१ ऑगस्ट :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'आदिशक्ती अभियान २०२५-२६' अंतर्गत सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीने सोयगाव तालुक्यात प्रथम क्रमांक (रु. १ लाख), तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक (रु. ३ लाख) पटकावून एकूण ४ लाख रुपयांच्या बक्षीसासह मानाच्या 'आदिशक्ती पुरस्कारा'वर आपले नाव कोरले आहे.महिला व बालविकास विभागाने ३१ जुलै २०२६ रोजी या पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली.

पुरस्कार व विजेत्या ग्रामपंचायतींचा तपशील

**शासनाच्या धोरणानुसार अभियानात अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना जाहीर झालेली बक्षीस रक्कम खालीलप्रमाणे आहे:**

**१,सोयगाव तालुकास्तरीय निकाल:**

**प्रथम क्रमांक:** घोसला ग्रामपंचायत १,००,०००

**द्वितीय क्रमांक:** शिंदोळ ग्रामपंचायत ५०,०००

**तृतीय क्रमांक:** जरंडी ग्रामपंचायत २५,०००




**२, नाही छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय निकाल:**

**प्रथम क्रमांक:** शिंदोळ ग्रामपंचायत ५,००,०००

**द्वितीय क्रमांक:** घोसला ग्रामपंचायत ३,००,०००

**तृतीय क्रमांक:** एकलहरा ग्रामपंचायत १,००,०००

( **माहितीसाठी** : राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार १० लाख, द्वितीय ७ लाख आणि तृतीय ५ लाख रुपये असा निश्चित करण्यात आला आहे.)

'या' कामगिरीमुळे मिळाला सन्मान

गावातील महिलांचे आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक व आरोग्यविषयक सबलीकरण करणे,कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना,बालविवाह प्रतिबंध आणि शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना तळागाळातील महिलांपर्यंत यशस्वीपणे पोहोचविल्याबद्दल घोसला ग्रामपंचायतीचा हा विशेष गौरव करण्यात आला आहे.सर्वसमावेशक सहकार्यातून मिळाले यश

**या यशाबाबत आनंद व्यक्त करताना ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले की:**

"गावातील आजी-माजी सरपंच,सर्व सन्माननीय सदस्य, पोलीस पाटील,तंटामुक्त अध्यक्ष,ग्रामसेवक,अंगणवाडी सेविका,आशा स्वयंसेविका,महिला बचत गट आणि समस्त घोसला ग्रामस्थांच्या अखंड मेहनत,मार्गदर्शन व मोलाच्या सहकार्यामुळेच हे ऐतिहासिक यश मिळवणे शक्य झाले आहे."पुरस्कार रक्कमेचा महिला विकासासाठी विनियोग

शासकीय नियमानुसार प्राप्त होणाऱ्या या पुरस्कार रक्कमेचा (एकूण ४ लाख रुपये) उपयोग ग्रामपंचायतीमार्फत गावात महिला सक्षमीकरण,आरोग्य, शिक्षण व महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या विविध नाविन्यपूर्ण योजना राबवण्यासाठी केला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

घोसला ग्रामपंचायतीच्या या अलौकिक यशामुळे गावाचा मान संपूर्ण जिल्ह्यात उंचावला असून,परिसरातून ग्रामपंचायत पदाधिकारी,महिला कार्यकर्ते व ग्रामस्थांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# एमजीएममध्ये 'वर्ल्ड वाईड वेब दिन' उत्साहात; एआय व सायबर सिक्युरिटीतील भविष्यातील संधींवर मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या वतीने 'वर्ल्ड वाईड वेब दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त चेकमार्क्सचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट प्रमुख श्रीनिवास धांडे यांचे 'एआय अँड सायबर सिक्युरिटी - इमर्जिंग ट्रेंड्स अँड फ्युचर जॉब प्रॉस्पेक्ट्स' या विषयावर विशेष व्याख्यान रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आले.



कार्यक्रमाला अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, संचालिका डॉ. शर्वरी तामणे, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच विविध विभागांतील मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्रीनिवास धांडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील सध्याचे तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली. एजेंटिक एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम) आणि एआयच्या नव्या युगातील संकल्पनांवर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच एजेंटिक एआयच्या विविध अनुप्रयोगांची माहिती देत, भविष्यातील तांत्रिक बदलांचा वेध घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आतापासूनच स्वतःला अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले.

भविष्यात फॉरवर्ड डिप्लॉइड इंजिनिअर, एआय ऑर्केस्ट्रेटर आणि एआय सिक्युरिटी रिसर्चर यांसारख्या नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील वेगवान तांत्रिक बदल, वाढते सायबर हल्ले आणि अधिक गुंतागुंतीच्या संगणकीय प्रणालींमुळे या क्षेत्रातील कौशल्यांचे महत्त्व वाढत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डेटा ॲनालिटिक्ससाठी आवश्यक साधनांचे ज्ञान, सांख्यिकी विषयावरील प्रभुत्व आणि मूलभूत संकल्पनांवरील भक्कम पकड ही यशस्वी करिअरसाठी अत्यावश्यक असल्याचेही श्री. धांडे यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालिका डॉ. शर्वरी तामणे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहसीन अन्सारी यांनी केले.



**जिंतूर - राज्यमंत्री तथा पालकमंत्री सौ मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते ऋषभ संदिप काळेगोरे यांनी नीट परीक्षेत यश घेतलेल्या विद्यार्थीचे घरी येऊन सत्कार करण्यात आला. त्या वेळी ऋषभची आई रुपाली, काकाकाकू, तसेच भाजपा जिल्हा संघटक डॉ पंडित दराडे, विलास भंडारे, सचिन रायपत्रीवार, विजय जाधव, गणेश कुऱ्हे, आदी उपस्थित होते.**

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911